# मेट्रो-३चे डबे भारतात बनणार

## मेट्रो-३ने गाठले 'मेक इन इंडिया'चे ध्येय

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

आशियाई विकास बँकेच्या नकारघंटेमुळे एमएमआरडीएच्या अखत्यारितील मेट्रो प्रकल्पांच्या डब्यांची ७५ टक्के निर्मिती भारतात करण्याचे स्वप्न भंगले असले, तरी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने मात्र मेक इन इंडियाचा झेंडा फडकवत ठेवला आहे. कॉर्पोरेशनच्या कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मार्गासाठी डब्यांची निर्मिती भारतातच केली जाणार आहे.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ या भूमिगत मार्गासाठी २४८ डब्यांची निर्मिती होणार आहे. सर्व डबे भारतातच तयार केले जाणार आहेत. त्यासाठी ऑलस्तोम ट्रान्स्पोर्ट इंडिया लि. आणि ऑलस्तोम ट्रान्स्पोर्ट एस. ए. फ्रान्स यांना संयुक्त कंत्राट देण्यात आले आहे. या प्रकल्पाला वित्त पुरवठा करणाऱ्या जपानच्या जायका या वित्तसंस्थेकडून मान्यता मिळाल्यानंतरच हे कंत्राट देण्यात आले आहे. डिझाइन, निर्मिती, पुरवठा, मांडणी, चाचणी व प्रकल्पाची प्रत्यक्ष सुरुवात या कामांचा कंत्राटात समावेश आहे. या मार्गासाठी आठ डब्यांच्या ३१ ट्रेन असतील. १८० मीटर लांबीच्या डब्याची ३०० प्रवासी वाहून नेण्याची क्षमता आहे. पूर्ण ट्रेनची प्रवासी क्षमता २३५० आहे. आरामदायी आसनव्यस्था ही डब्याची खासियत असेल. ट्रेन २५ कैव्ही एसी ट्रॅक्शन विद्युत पुरवठ्यावर कार्यरत असेल. प्रत्येक बाजूला चार दरवाजे अशी व्यवस्था आहे.



### मेट्रो डब्यांची वैशिष्ट्ये

- एलईडी प्रकाश योजना
- ३५ वर्षे ट्रेनमध्ये तक्रार येणार नाही
- उत्तम वेग नियंत्रण, वीजबचत यासाठी ७५ टक्के मोटरायझेशन
- उत्तम वातानुकूल यंत्रणा
- एलईडी स्क्रीनवर दरवाजा मार्गदर्शन प्रणाली
- प्रवाशांच्या माहितीसाठी डिजिटल मार्ग नकाशा
- मदत केंद्र

### आशियाई विकास बँकेचा खोडा

कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ या मेट्रो प्रकल्पाच्या डब्यांची बांधणी देशातच करण्यात मुंबई मेट्रो कॉर्पोरेशनला यश आले असताना एमएमआरडीएला मात्र आशियाई विकास बँकेच्या आडकाठीमुळे मेक इन इंडियाचे ध्येय गाठता आले नाही. मेट्रो ३ मार्ग वगळता अन्य मार्गांची जबाबदारी एमएमआरडीएकडे आहे. या मार्गांच्या डब्यांची ७५ टक्के बांधणी भारतात करण्याचा एमएमआरडीएचा मानस होता. मात्र या प्रकल्पांना कर्ज पुरवणाऱ्या बँकेने त्यास नकार दिला. बँकेची ही भूमिका एमएमआरडीएने केंद्र सरकारला कळवली. त्यानंतर डब्यांची बांधणी करण्याकरिता जागतिक स्तरावर निविदा मागवण्याचे ठरले.